# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

जाक्र/लाशमनपा / 5593 /

दि. 02 /07/२०२५

## कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका, लातूर, आरोग्य विभाग येथे विविध संवर्गातील रिक्त पदांची, कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, नियम, अटी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई व लातूर शहर महानगरपालिका येथील संकेतस्थळ (www.nrhm.maharashtra.gov.in), (www.arogya.maharashtra.gov.in) (www.mclatur.org) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून, इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह

दि. 11/ 07 /२०२५ रोजीपर्यंत कार्यालयीन विहित वेळेत उपस्थित राहावे.

अध्यक्ष निवड समीती तथा
आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

**WEB SITE DOCUMENT UPLOAD FROM (WDU)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name Of Program | National urban health mission | | | |
| Name & Designation Of Officer | Dr shankar Bharti. | | | |
| Date of Publication | 02/07/2025 | | | |
| Displayed On Website (Please Checkbox) | www.nrhm.maharashtra.gov.in | ✓ | www.arogya.maharashtra.gov.in | ✓ |
| Published on section/tab of website | लातूर शहर महानगरपालिका लातूर | | | |
| Document Title Should Be Displayed As (In Marathi) | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त पदाची जाहिरात | | | |
| Document Title Should Be Displayed As (In English) | NUHM, vacant. post advertisment publication | | | |
| Document Size(Document Should be in PDF format & Size will Not More than 20MB) | | | | |

**Declaration**

I hereby declare that all information provided in this website document upload form (WDU) for the purpose of uploading / updating document on website only and correct to the best of my knowledge. All documents responsibility will be on concern programme department only; IT NHM department is not responsible for any breach cause to content of uploaded documents. IT NHM department is responsible only for uploading/updating documents on websites

Date 02/07/25

Signature of Program Authority

Scanned with OKEN Scanner

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
## कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर खालील पदांसाठी मुलाखत आयोजित करण्यात येत आहे.

लातूर महानगरपालिका पदस्थापना

### तक्ता क्र. ०१

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांन अंतर्गत रिक्त पदे (NUHM)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | 04 | MBBS MC/MMC Council कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ६००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | अनु.जाती. १<br>अनु.जमाती १<br>एस.ई.बी.सी. १<br>वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज (ड), वि.मा.प्र ०१ |
| 2 | वैदयकीय अधिकारी (अर्धवेळ) | 03 | MBBS MC/MMC Council कडील नोंदणी अनिवार्य | ७० वर्ष | ३००००/- | प्रा.ना.आ.केंद्र | सामाजिक आरक्षन लागू नाही |

### तक्ता क्र. ०३

१५ वा वित्त आयोग अंतर्गत रिक्त पदांचा तपशील (Polyclinic)

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | कामाचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physician | 03 | MD Medicine / DNB | ७० वर्ष | To visit once in every fortnight. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 | Polyclinic/ प्रा.ना.आ.केंद्र UPHC वेळ ०४ तास | मानसेवी तज्ञ असल्यामुळे बिंदुनामावली लागू नाही. |
| 2 | Obstetrics & Gynecologist | 03 | MD /MS Gyn / DGO /DNB | ७० वर्ष | | | |
| 3 | Pediatrician | 03 | MD Pead / DCH /DNB | ७० वर्ष | | | |
| 4 | Ophthalmologist | 02 | MD Opthalmologist /DOMS | ७० वर्ष | | | |
| 5 | Dermatologist | 01 | MD (Skin/VD)/DVD, DNB) | ७० वर्ष | | | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | **Psychiatrist** | **04** | **MD Psychiarty /DPM /DNB** | **७० वर्ष** | **Per patient checked of his / her specialty to maximum Rs. 5000/- Visit** | | |
| 7 | **ENT Specialist** | **04** | **MS ENT / DORL / DNB** | **७० वर्ष** | | | |

उपरोक्त पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी आपले सर्व शैक्षणिक अहर्तोबाबतचे कागदपत्रासह दि /०७/२०२५ रोजी मा.आयुक्त महोदया यांच्या दालनामध्ये वेळ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उपस्थित रहावे. सायंकाळी ५.०० नंतर येणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. मुलाखतीस उपस्थित असणा-या उमेदवारास प्रवास भत्त व इतर उनुज्ञेय लागू असणार नाही. उमेदवारांनी स्वखर्चानी मुलाखतीस उपस्थित रहावे.

अटी व शर्ती :-

१) वैद्यकीय अधिकारी पुर्णवेळ NUHM व वैद्यकीय अधिकारी 15 वा वित्त आयोग या पदासाठी पात्र उमेदवारासाठी मुलाखत आयोजित करण्यात येईल.

२) अनुभवासाठी वैद्यकीय अधिकारी पदासाठी शासकीय तसेच खाजगी रूग्णालयातील अनुभव गृहीत धरण्यात येईल.

३)एकूण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल व प्रतीक्षा यादीची स्वतंत्र यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

४) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रीत मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि.२९ जून २०२६ पर्यंतच राहू शकेल.परंतू, वरील पदे सन २०२५-२६ मध्ये मंजूर झाल्यास व आपले कामकाज समाधानकारक असल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती देण्यात येईल.

५) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी एमबीबीएस विशेषज्ञ यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष राहिल.

६) वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील तसेच निवड झाल्यानंतर प्रत्येकवर्षी सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुर्नर्नियुक्ती आदेश देण्यात येतील.

७) उपरोक्त संबधित पदाकरीता तत्सम कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८) जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता उमेदवारांची संख्या विचारात घेवून गुणवत्तेनुसार मुलाखतीकरीता १ : ५ प्रमाणे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

९) शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या उमेदवारांना मानधन शासन निर्णय क. संकिर्ण २०१५/प्रक्र/१००/१३ दि. १७.१२.२०१६ व राज्य आरोग्य सोसायटी कडून प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार अदा करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१०) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

११) अर्जदारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.अश्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र (Caste Certificate) जोडणे आवश्यक राहील.

१२) आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करण्यात येईल व आरक्षित संवर्गातील उमदेवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

१३) केंद्र / राज्य शासनाने संबंधीत पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४) सर्व पदांसाठी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची १० वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र) १२ वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र ) पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष) सर्व Attempt सह जेणेकरुन एकत्रित गुण काढणे सोईचे होईल. पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसांक्षाकिंत) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

१५) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१६) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवानांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१७) भरती प्रक्रिया स्थगीत करणे / रद्द करणे / पदभरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती. लातूर शहर महानगरपालिका, लातुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१८) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१९) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

२०) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असलयाबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपूष्टात आणून, प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

२२) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी शैक्षणीक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र इत्यादी साक्षांकीत प्रतिंसह व मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी हजर रहावे.

Scanned with OKEN Scanner

पदभरती संदर्भातील वेळोवेळी प्रकाशीत करण्यात येणाऱ्या सुचना फक्त (www.nrhm.maharashtra.gov.in ), (www.arogya.maharashtra.gov.in) ( www.mclatur.org) या संकेतस्थळावर तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल याची वेगळी सुचना दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी,

अध्यक्ष निवड समीती तथा
आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner